थोडक्यात

शहरात वाहनचोरट्यांचा सुळसुळाट! आयुक्तालय हद्दीतून ५ दुचाक्या लंपास

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । शहर आयुक्तालय हद्दीमध्ये पुन्हा दुचाक्या चोऱ्या वाढल्या आहेत. पंचवटी, आडगाव, गंगापूर आणि इंदिरानगर परिसरातून पाच दुचाक्या चोरट्यांनी लंपास केल्या आहेत. याप्रकरणी संबंधित पोलिस ठाण्यामध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. संजय राधाकृष्ण पवार (रा. पिंगळे नगर, पेठरोड) यांची १५ हजारांची दुचाकी (एमएच १५ बीवाय ८०२७) २९ मार्च रोजी मार्केट यार्डजवळील सिद्धकला प्रिंटींग प्रेससमोरून अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी पंचवटी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भागवत गोपाळराव शिंदे (रा. मोहाडी, ता. दिंडोरी) यांची १० हजारांची दुचाकी (एमएच १५ बीएल ८०८४) २६ मार्च ोजी सकाळी साडेनऊ ते साडेअकरा या दरम्यान आडगाव येथील वैद्यकीय महाविद्यालयाच्या पार्किंगमधून चोरीला गेली. याप्रकरणी आडगाव पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजनारायण बटुकदेव (रा. पारिजातनगर, नाशिक) यांची ३५ हजारांची पल्सर दुचाकी (एमएच १५ जेजी ८२०३) २८ मार्च रोजी पारिजातनगर येथील सायकल सर्कलजवळ पार्किंगमध्ये पार्क केली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी गंगापूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर इंदिरानगर परिसरातून दोन दुचाक्या चोरीला गेल्या असून, बबन निवृत्ती वर्पे (रा. पांडवनगरी, इंदिरानगर) यांची २० हजारांची दुचाकी (एमएच १५ एचएस ४५७२) गेल्या १५ मार्च रोजी मध्यात्री राहत्या द्रोणाचार्य इमारतीच्या पार्किंगमधून चोरीला गेली. तर, मनिष सुभाष पवार (रा. चार्वाक चौक, इंदिरानगर) यांची ३० हजारांची स्प्लेंडर दुचाकी (एमएच १५ एपी ६८६७) २० मार्च रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास स्टेट बँक कॉलनीतील स्वामी बंगल्यासमोर पार्क केली असता, अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी इंदिरानगर पोलिसात गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

अल्पवयीन मुलीने बाळाला दिला जन्म

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । अल्पवयीन मुलीशी ओळख निर्माण करुन तिच्या अज्ञात पणाचा फायदा घेऊन तिच्यावर लैंगीक अत्याचारातून गर्भवती झालेल्या पिडीतेने बाळाला जन्म दिला आहे. याप्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, फिर्यादी महिलेची पिडीत मुलगी ही अल्पवयीन असून, ती अज्ञात आहे. दरम्यान आरोपी रोहित गणपत कडाळे (वय २०, रा. शिवाजीवाडी, वडाळा-पाथर्डीरोड) याने या मुलीशी ओळख निर्माण करुन तिच्याशी मैत्री केली. त्यानंतर कडाळे याने फेब्रुवारी २०२३ ते २९ मार्च २०२४ या कालावधीत पिडीत मुलीच्या अज्ञानाचा फायदा घेऊन रविवार कारंजा येथील पेठे हायस्कूलजवळून स्वतःच्या मोटारसायकलीने पांडवलेणे येथे वेळोवेळी घेऊन जाऊन तेथे असलेल्या तितली गार्डनमध्ये तिच्यासोबत वारंवार लैंगीक अत्याचार केले. यातून ही मुलगी गर्भवती झाली. व तिने एका स्त्री जातीच्या बाळाला जन्म दिला. ही बाब लक्षात आल्यानंतर पिडीत मुलीच्या आईने प्रथम मुंबई नाका पोलीस ठाण्यात संशयित आरोपी रोहित कडाळे याच्याविरुद्ध बलात्काराची फिर्याद दिली असून, हा गुन्हा इंदिरानगर पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला आहे.

अपघातात सात वर्षीय बालकाचा मृत्य

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । दुचाकीवरून जात असताना पुढे असलेल्या चारचाकीच्या दाराला जोरदार धडक दिल्याने दुचाकीवर पुढे बसलेल्या सात वर्षीय बालकाचा अपघातात मृत्यू झाल्याची घटना पाथर्डी फाटा ते पाथर्डी रोड दरम्यान घडली. तत्सम राहुल पानपाटील (वय ७, रा. मोंढेनगर, उत्तमनगर, सिडको) असे अपघातात मृत्यू झालेल्या बालकाचे नाव आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, राहुल पानपाटील हे आपल्या मित्राच्या मोटारसायकलवर तत्सम सोबत पाथर्डी फाटा येथून पाथर्डी गावाकडे जात होते. पुजा टेक्सटाईलजवळ आले असता त्यांची दुचाकी एम.एच.१५ डी.एम. १२३० या क्रमांकाच्या आय१० गाडीच्या डाव्या दरवाजावर जाऊन आदळली. या अपघातात तत्समच्या डोक्याला जबर मार लागला. त्याच्या शरीरातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने त्याला उपचारासाठी एका खासगी रुग्णालयात नेण्यात आले. औषधोपचार सुरु असताना त्याचा मृत्यू झाला.अपघातस्थळी नागरिकांनी गर्दी केली होती. घटनेची माहिती मिळाल्यानंतर तत्काळ इंदिरानगर पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. याप्रकरणी पुढील तपास इंदिरानगर पोलीस करत आहे.

शहरातून तीन मुलींचे अपहरण

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । शहरातील वेगवेगळ्या तीन ठिकाणांहून अज्ञात इसमांनी कशाचे तर आमिष दाखवून पळवून नेत तीन मुलींचे अपहरण केल्याप्रकरणी विविध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अपहरणाचा पहिला प्रकार मखमलाबाद रोड येथे घडला. फिर्यादी हे काही कामानिमित्त बाहेर गेले होते. त्यावेळी त्यांची मुलगी सुदर्शन कॉलनी येथील घरी एकटीच होती. त्यावेळी अज्ञात इसमाने या मुलीला काही तरी फूस लावून पळवून नेत तिचे अपहरण केले. बराच वेळ होऊनही मुलगी घरी परतली नाही म्हणून तिच्या पालकांनी पंचवटी पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध अपहरणाची फिर्याद दिली असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सोनवणे करीत आहेत. अपहरणाचा दुसरा प्रकार अशोकस्तंभ परिसरात घडला. फिर्यादी हे अशोकस्तंभ परिसरात राहतात. दि. २ नोव्हेंबर २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत आरोपी सागर कुमावत व अभिषेक कुमावत (दोघांची पूर्ण नावे व पत्ते माहीत नाहीत) यांनी फिर्यादीच्या मुलीस प्रेमाचे आमिष दाखवून तिला घेऊन जात तिच्यावर लैंगिक अत्याचार केले, तसेच ही मुलगी काही कामानिमित्त घराबाहेर गेली होती. ती बराच वेळ होऊनही घरी परतली नाही, म्हणून तिच्या पालकांनी तिचा शोध घेतला; मात्र ती मिळून आली नाही. या प्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात आरोपी सागर कुमावत व अभिषेक कुमावत यांच्याविरुद्ध मुलीच्या अपहरणाची फिर्याद नोंदविण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गावडे करीत आहेत. अपहरणाचा तिसरा प्रकार अंबड परिसरात घडला. फिर्यादी यांची मुलगी राहत्या घरातून उत्तमनगर येथे कॉलेजला जाऊन येते, असे सांगून गेली. ती अद्यापपर्यंत घरी आली नाही, त्यावरून या मुलीचे अज्ञात इसमाने कशाचे तरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेत तिचे अपहरण केले. यावरून अंबड पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक उंडे करीत आहेत.

नाशिक शहरात थकबाकीदारांच्या ६४१ नळजोडण्या खंडित

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । वारंवार नोटीस बजावूनही महापालिकेकडे थकबाकी अदा ना करणाऱ्या ६४१ थकबाकीदारांच्या नळजोडण्या खंडित करत थकबाकीदार विरोधात कर विभागाने जोरदार मोहीम उघडली आहे. यंदा महापालिकेने घरपट्टीमध्ये २०६ कोटी रुपयांची वसुली केली आहे. मागील काही वर्षात सर्वाधिक वसुली झाली आहे. पाणीपट्टीचीदेखील ५४ कोटी रुपयांची वसुली झाली आहे. मात्र पाणीपट्टी वसुली ही सरासरी आहे. विविध कर विभागाला ७५ कोटी रुपयांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. त्यापैकी ५४ कोटी रुपये वसुली झाली. जानेवारी महिन्यात पाणीपट्टीची अपेक्षित वसुली होत नसल्याने कर विभागाने थकबाकीदांराविरोधात मोहीम उघडली. शहरात २ लाख ७ हजार नळजोडण्या आहेत. त्यातील ४४ हजार ३८५ नळजोडणी धारकांकडे ९५.७५ कोटी रुपयांची थकबाकी आहे. त्यामुळे फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात थकबाकीदारांना नोटीस बजावण्यात आल्या. त्यानंतर नोटीस देऊनही अपेक्षित वसुली होत नसल्याने २२ फेब्रुवारीपासून मोठ्या थकबाकीदारांविरोधात मोहीम सुरू करण्यात आली. मोहिमेसाठी संयुक्त पथके तयार करण्यात आली. पथकांच्या माध्यमातून ६४१ थकबाकीदारांच्या नळजोडणी खंडित करण्यात आल्या. थकबाकी अदा केल्यानंतर नळजोडण्या पूर्ववत केल्या जाणार असून, परस्पर नळजोडणी केल्यास फौजदारी गुन्हे दाखल केले जाणार असल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाचे अधीक्षक अभियंता संजय अग्रवाल यांनी दिली. अशी झाली कारवाई विभाग खंडित नळजोडणी संख्या सिडको २९८ सातपूर १३३ नाशिक रोड ११४ पंचवटी ८२ पूर्व ८ पश्चिम ६

मराठी पाट्यांची मोहीम कागदावरच

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । शहरातील ६५ हजाराहून अधिक व्यावसायिक आस्थापनांचे फलक इंग्रजीबरोबरच मराठी भाषेत लावण्यासंदर्भात महापालिकेने अद्यापही ठोस पावले उचलली नाहीत. आता लोकसभा निवडणूक आचारसंहितेचे कारण देत चालढकल केली जात आहे. पुढील आठवड्यात गुढीपाडवा हा मराठी दिन साजरा होत असताना अद्यापही राज्य शासनाच्याच निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. सर्वोच्च न्यायालयाने २५ नोव्हेंबर २०२३ पर्यंत इंग्रजी बरोबरच मराठी पाट्या लावण्याच्या सूचना दिल्या होत्या. मराठी पाट्या लावल्यास त्या आस्थापनेत काम करणाऱ्या कर्मचारी व कर्मचाऱ्यांच्या संख्येनुसार प्रत्येकी दोन हजार रुपये दंडात्मक आकारणी करण्याचे निर्देश देण्यात आले होते. नाशिक महापालिकेकडून शहरातील ६५ हजार व्यावसायिक आस्थापनांना मराठीमध्ये पाट्या लावण्याचे नोटिसा पाठविण्यात आल्या. परंतु दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार नसल्याने या संदर्भात कामगार आयुक्त कार्यालयाकडे महापालिकेच्या विविध कर विभागाकडून अभिप्राय मागविण्यात आला. कामगार आयुक्त कार्यालयाकडून अवघ्या पंधरा दिवसातच अभिप्राय दिला असताना महापालिकेच्या दप्तरी मात्र अभिप्रायाचे पत्र हरवल्याची नोंद झाली होती. कामगार आयुक्त कार्यालयाकडून पत्रच मिळाले नसल्याचे विविध कर विभागाकडून सांगण्यात आले. परंतु कामगार आयुक्त कार्यालयाने पंधरा दिवसातच पत्र पाठविल्याचा पुराव्यासह खुलासा केल्यानंतर महापालिकेचा भोंगळ कारभार समोर आला होता. त्यानंतर महापालिकेच्या समाजकल्याण विभागाकडे पत्र आढळून आल्याची सारवासारव महापालिकेच्या विविध कर विभागाकडून करण्यात आली होती. दरम्यान, महिना उलटत असताना विविध कर विभागाकडून मराठी पाट्या न लावणाऱ्या व्यावसायिकांवर अद्यापही कारवाई झालेली नाही. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्याने जवळपास अडीच हजार कर्मचारी निवडणूक कामासाठी वर्ग केला जाणार आहे. त्यामुळे आचारसंहितेच्या नावाखाली चालढकल केली जात असल्याचे दिसून येत आहे. व्यावसायिकांवर दंडात्मक कारवाईची अपेक्षा नाही. परंतु इंग्रजीबरोबरच मराठी पाट्या लावल्या जाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

गावठी कट्टा दिसल्यास पोलिसांना संपर्काचे आवाहन

नाशिक । परिसरात सध्या गावठी कट्टे सापडण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. येत्या दोन महिन्यांत अनेकांवर कारवाई झालेली असून उपनगर आणि नाशिक रोड पोलिस स्टेशन यांनी सध्या कट्टे विकणाऱ्या टोळ्या नेस्तनाबूत करण्यासाठी मोहीम हाती घेतली आहे. यामध्ये लोकसहभागही घेणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. नाशिक रोडला अरिंगळे मळा, रोकडोबा वाडी, फर्नांडिस वाडी येथील स्वप्नील इमारत, गोरेवाडी, देवळालीगाव, विहितगाव, स्टेशन वाडी, सिन्नर फाटा, उपनगर येथील आम्रपाली झोपडपट्टी, गुलाबवाडी, गुलजारवाडी या भागांमध्ये आजपर्यंत अनेकवेळा कट्टे हस्तगत केलेले आहेत. कट्टे सापडण्याचे इंगळे मळा, रोकडोबा वाडी, फर्नांडिस वाडी, गोरेवाडी, देवळालीगाव, विहितगाव हे हॉटस्पॉट आहेत. गेल्या दोन महिन्यांत कट्टे सापडण्याच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. भुसावळ, मध्य प्रदेश, खंडवा, या परिसरातून कट्टे येत असल्याची चर्चा नाशिक रोड परिसरात आहे. दहशत पसरवणे, फॅशन म्हणून आणि भाईगिरीसाठी गावठी कट्टे बाळगण्याचे फॅड वाढत आहे. अशा गावगुंडांवर कारवाईसाठी सध्या नाशिक रोड पोलिस स्टेशन आणि उपनगर पोलिस स्टेशन अलर्ट आहे. झोपडपट्ट्यांमध्ये लोकसंपर्क वाढविण्याबरोबरच पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांची दत्तक गुन्हेगार योजना सध्या नाशिक रोड परिसरात राबवली जात आहे. त्यामुळे कट्टे किंगचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी नागरिकांमध्ये जनजागृती मोहीम हाती घेतली आहे. उपनगर पोलिस स्टेशनचे निरीक्षक जितेंद्र सपकाळे आणि नाशिक रोड पोलिस स्टेशनचे निरीक्षक रामदास शेळके यांनी यासंबंधी जागरूकता निर्माण करण्यासाठी मोहीम हाती घेतली आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने आयोजीत केलेल्या 'वाचनानंद लेखनानंद' स्पर्धेचे अंतिम निकाल जाहिर

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सर्व शिक्षणक्रमाच्या अध्ययनार्थींना आवांतर वाचन व लेखनाची आवड निर्माण व्हावी आणि दर्जेदार अनुभव लेखन साहित्याची पायाभरणी करण्यासाठी, मुक्त विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कडर्क अध्यासन आणि संवाद पत्रिका यांच्या संयुक्त विद्येमाने वाचनानंद लेखनानंद स्पर्धा (मनोगत लेखन, प्रवास वर्णन लेखन व काव्य लेखन) आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेचा अंतिम निकाल नुकताच जाहिर करण्यात आलेला आहे. विजेते स्पर्धक पुढीलप्रमाणे : प्रथम क्रमांक - कु. सरिता सुभाष पुनासे, मोर्शी, अमरावती. द्वितीय क्रमांक - श्री. सुदर्शन सदाशिव विघ्ने, अमरावती मध्यवर्ती कारागृह. तृतीय क्रमांक (विभागून) - श्रीमती जयश्री सीताराम पवार, पुसद, यवतमाळ. श्री. शिवचंद प्राण बनसोड, अमरावती मध्यवर्ती कारागृह. सर्व विजेत्या स्पर्धकांचे मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, कुलसचिव श्री. दिलीप भरड यांनी अभिनंदन केले. तज्ज्ञ परीक्षक म्हणून डॉ. प्रकाश बर्वे आणि श्री. दत्ता पाटील यांच्या समितीने मूल्यांकन केले. परितोषिकाची रक्कम एनईएफटी/ आरटीजीएस द्वारे व प्रमाणपत्रे टपालाद्वारे पाठवण्यात येतील, अशी माहीती महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाचे प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी दिली.

कर सवलत योजना कायम

गाळे थकबाकीदारांवरील कारवाई सुरुच राहणार

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । महापालिकेकडून दरवर्षी दिली जाणारी कर सवलत योजना कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गाळेधारकांवरील थकबाकी वसुल करण्यासाठी गाळे जप्तीची कारवाईही केली जाणार असल्याची माहिती कर विभागाचे प्रभारी उपायुक्त विवेक भदाणे यांनी दिली. महापालिकेला यंदा मालमत्ता कराच्या माध्यमातून चांगले उत्पन्न प्राप्त झाले. मार्चअखेर २०६ कोटी रुपयांचे उत्पन्न तिजोरीत जमा झाले. त्यात कर सवलत योजनेतून उत्पन्नाचा वाटा अधिक असल्याने या वर्षीदेखील कर सवलत योजना सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नियमित करदात्यांना प्रोत्साहन देण्यासाठी एप्रिल महिन्यात घरपट्टीच्या रकमेत ८ टक्के, मेमध्ये ६ टक्के, तर जून महिन्यात ३ टक्के अशी सवलत योजना आहे. ३० जूनपर्यंत सवलत योजना सुरू राहील. सवलतीच्या महिन्यात महापालिकेच्या कर विभागाकडे मालमत्ता करातून जवळपास २५ टक्के रक्कम जमा होते. त्यामुळे महसुलाच्या बाबतीत दिलासा मिळतो. मागील वर्षात २ लाख १६ हजार २४० मिळकतधारकांना योजनेचा लाभ मिळाला होता. सवलत योजनेतून ९०. ७७ कोटी रुपयांचा महसुल मिळाला होता. त्यामुळे यंदादेखील सवलत योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ऑनलाइन कर भरणा केल्यास अतिरिक्त दोन टक्के सवलतीचा लाभ मिळणार आहे. सौरऊर्जा, सोलर प्रकल्प, पाण्याचा पुनर्वापर संदर्भातील सवलतीत कोणत्या तरी एकाच सवलतीचा लाभ करदात्यांना दिला जाणार आहे. महापालिका हद्दीमध्ये जवळपास २९०० ओटे, गाळेधारक आहे. त्यांच्याकडे जवळपास ५१ कोटी रुपयांची थकबाकी आहे. १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च कालावधीत १०.३० कोटी रुपये वसुल झाले. ४१.३० कोटी रुपये वसुल करण्यासाठी मार्चअखेरही गाळे जप्तीची मोहीम सुरू ठेवली जाणार आहे. अशी माहिती प्रभारी उपायुक्त विवेक भदाणे यांनी दिली.

वाढत्या उन्हामुळे जिल्ह्यात वणव्यांचा कहर

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । जिल्ह्यात दरवर्षी प्रमाणे यंदाही उन्हाची तीव्रता वाढताच वणव्याचा कहर दिवसेंदिवस वाढत आहे. वन पर्यावरण, जैवविविधतेला जीवघेणा धोका असतानाही वणवा रोखण्यासाठीचे वन, पर्यावरण खात्याकडून पुरेशी दक्षता घेतली जात नाही, तसेच वणवा लागलेल्या भागात झालेल्या नुकसानीकडे व वणवा लावणाऱ्यांचा शोध घेण्याकडे अजूनही गांभीर्यानि बघितले जात नाही.

याबाबत दोषी व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी शिवकार्य गडकोट संवर्धन संस्था, दरिमाता पर्यावरणमित्र व समविचारी पर्यावरण मित्र, विविध संस्था व संघटनांनी केली आहे. नाशिक जिल्ह्यातील वनक्षेत्र मानवी दुष्कृत्यामुळे वणव्याच्या कचाट्यात सापडले आहे. वाढत्या वणव्यात यंदा रामशेजला चारदा वणवा लागला. रोहिला घाटातील डाव्या बाजूचा वन डोंगर, धुमोडी वनक्षेत्र, खोरीपाडा वनक्षेत्र, वाघेरा-हरसूल घाटात वणव्याचा कहर नेहमीचा असल्याने नैसर्गिक संसाधनांचे नुकसान होत आहे. वन्यजीव, पक्षी विस्थापित होत आहेत, अनेक दुर्मिळ झाडी, रोपे, नैसर्गिक बीज, एकूणच याठिकाणी असलेली जैवविविधता यात अतोनात नष्ट होत आहे.

याबाबतीत व्यापक प्रयत्न हाती घेऊन वन पर्यावरण खात्याने पर्यावरण संस्था व वनसमित्या यांनी एकत्रित येत वनसंरक्षण, लाकूड तस्कर यांना रोखणे, कुऱ्हाडबंदी, जाळपट्टे उभारणी, वनमाफियांचा शोध, कठोर कायदेशीर कारवाई बाबतीत प्रयत्न करावे, अशी मागणी शिवकार्य डकोट संवर्धन संस्था, नाशिक, दरिमाता पर्यावरणमित्र, साहित्यिक पर्यावरण मित्र देवचंद महाले, व समविचारी पर्यावरण मित्र, विविध संस्था यांनी केली आहे. याबाबतीत निवेदनाद्वारे केंद्र व राज्य सरकारच्या वन, पर्यावरण विभागास निवेदनही दिले जाईल. वणवा हे निसर्गावर आलेले महाभयंकर संकट आहे, याबाबत अजूनही शासन, प्रशासन, समाज, गंभीर नाही. उरल्यासुरल्या नैसर्गिक डोंगर, टेकड्या, घाटातील जैवविविधता वन्यजीव, पक्षी, दुर्मिळ झाडे कुऱ्हाडीच्या व वणव्याच्या हवाली असल्याचे चित्र थांबविण्यासाठी प्रयत्नांची गरज असल्याचे मत निसर्गमित्र देवचंद महाले यांनी व्यक्त केले. मातोरी गायरानातील वणवा थेट दऱ्या देवी पर्यावरण क्षेत्रापर्यंत धडकतो, आम्ही पर्यावरण मित्र, सहकारी शेतकरी, राह फाऊंडेशनचे कार्यकर्ते, गवळवाडीचे गावकरी वणवा थांबविण्यासाठी येतात; मात्र आता वणवा थांबवण्यासाठी व्यापक जागृती व उपाय योजले का जात नाहीत? असा सवाल दरीमाता वृक्षमित्र भारत पिंगळे व शिवाजी धोंगडे यांनी केला.

एल&टी फायनान्स लिमिटेड
(पुर्वीची एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय: एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177 कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
CIN No.: U65910WB1993FLC060810
शाखा कार्यालय: नाशिक

L&T Finance

तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी ''**सार्वजनिक लिलावाद्वारे**'' ''**जिथे आहे जसे आहे तत्वावर**'' आणि ''**ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर**'' खालील मालमत्तेचा लिलाव करीत आहेत.

कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/ अनेक)	भौतिक ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 28.03.2024 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. वीरेंद्र शिव शंकर कुमार 2. संदिप भावसाहेब दराडे	मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल पत्ता - फ्लॅट नं. 3, स्टिल्ट मजल्यावर 550 चौ.फूटचा बिल्ट-अप एरिया, साई प्रसाद अपार्टमेंट, सर्वे क्र.332/3/2/4, प्लॉट क्र.4 , पार्क सायड रेसिडेन्सी समोर, वडाळा-पाथर्डी रोड, नाशिक सिमा: पूर्व - मार्जिनल स्पेस; पश्चिम - पॅसेज आणि फ्लॅट क्रमांक 02; उत्तर - मार्जिनल स्पेस; दक्षिण - फ्लॅट क्र. 04	NSKHL18000182 & NSKHL18000276	1 मार्च 2024	रु. 1,51,790.50/-	रु. 31,19,757.72/-	रु. 15,17,905/-	02-05-2024	08-05-2024 सकाळी 10 ते संध्याकाळी 5:30

सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता ''**जशी आहे जिथे आहे तत्वावर**'' आणि ''**जशी आहे ज्या स्थितीत आहे**'' त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **07/05/2024** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **08/05/2024** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **09/05/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतर्दीनतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेची तपासणी करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात, **नाव - शेखर काळे, संपर्क क्रमांक 9823271111, ऑफिस एल&टीफायनान्स लिमिटेड, ऑफिस क्रमांक 301, 3रा मजला, झेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुल जवळ, शिवाजी नगर, पुणे - 411005. आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स लिमिटेड, ऑफिस: 6 वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटीरोड, मर्सिडीज शोरूमजवळ, सांताक्रूझ (04), मुंबई 098.** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बोली/ऑफर स्वीकार/नाकारू/सुधारू/रद्द करू शकतो किंवा ई-लिलाव ढकलू ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 03.04.2024
ठिकाण: नाशिक

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, **मुख्य संपादक** अशोक विठ्ठल सोनवणे यांनी शितल प्रिंटर्स, प्लॉट नं. ६०, भूषण नगर, केडगाव देवी, अहमदनगर ४१४००१ (महाराष्ट्र) येथून छापून शॉप नं. २, तिसरा मजला, बळवंत प्लाझा, वकील वाडी, हॉटेल पंचवटीच्यासमोर, नाशिक - १, पिन - ४२२००१ येथे प्रकाशित केले. ✻ **व्यवस्थापकीय संपादक** - रंजन साळवी. फोन नं. (०२५३) २३१०६०० RNI : MAHMAR/2011/41224. EMAIL : lokmanthan.nashik2498@gmail.com (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील.)